Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-9 | March-2015
Available online at www.aygrt.isrj.org

लोकसाहित्य आणि ललित साहित्य

वी□ □शवराव फ□लबिले(वसे□र)

मराठी विभाग प्रमुख, नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ.

सारांश - एखादी संकल्पना समजून घेताना त्या संदर्भात इतर सर्व बाबींचा विचार करणे अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकते. जसे ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यांच्यातील साम्यांचा शोध घेतल्याने ग्रामीणतेची संकल्पना स्पष्ट होण्यास मदतच होते. लोकसाहित्याचा व ग्रामीण साहित्याचा असाच निकटचा अनुबंध आहे. या अनुबंधाचा शोध घेण्यापूर्वी ललित साहित्य व लोकसाहित्य या दोन संकल्पनांतील साम्य शोधल्यास त्याची उपयुक्तता अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची ठरेल. ग्रामीण साहित्य हे अंतिमत: ललित साहित्यच आहे. एकूण साहित्याच्या अभ्यासाच्या सोईसाठी व त्याच्या प्रकृती व प्रवृत्ती भिन्नतेमुळे ललित साहित्याची वेगवेगळ्या गटात विभागणी केलेली असते.

प्रस्तावना :

ललित साहित्यातील 'ललित' हे विशेषण आहे. साहित्या विषयी ते वेगळे काहीतरी सांगते. 'ललित' म्हणजे सुंदर हे त्याचे वैशिष्ट्य असते. ज्या लेखनात लालित्य म्हणजे सौंदर्य उतरेल असेच लेखन साहित्य Literature या पदवीस पोचते.साहित्याच्या आस्वादामुळे रसिकाच्या मनास आनंद होतो. हेच ललित म्हणजे सुंदर होय. '□ामीणता' ही संकल्पना समजून घेण्यासाठी सर्व संबंधित बाबींचा शोध घेऊन आपले म्हणणे साधार स्पष्ट करण्यासाठी ललित साहित्य व लोकसाहित्य यांच्यातील अनुबंध शोधले जात आहेत. □ामीण साहित्य हे शेवटी ललित साहित्यच आहे.ललित साहित्याची सर्व वैशिष्ट्ये ग्रामीण साहित्यात आढळतात.

लोक साहित्य व ललित साहित्य या दोन्हींमध्ये फारमोठ्या प्रमाणात सारखेपणा आहे. लालित्य हा गुणधर्म ग्रामीण साहित्याचा महत्वाचा असून त्याची उपस्थिती बऱ्याच वेळा लोकसाहित्यात आढळून येते. लालित्य या गुणधर्मामुळे दोन्हींमध्ये सौंदर्य निर्मिती होते. त्यांच्या आस्वादाने रसिकास आनंद होतो. तीच सौंदर्य निर्मिती असते.

ललित साहित्यात नवे कल्पनाबंध (मूलभूत आकार) व रचनाबंध जे दिसून येतात; त्याचा आधार लोकसाहित्य असते. लोकसाहित्यातून ललित लेखकाने हे बंध उचलल्यामुळे ललित साहित्यात पारंपरिकता आढळून येते. म्हणजे जेव्हा हे कल्पनाबंध व रचनाबंध लोकसाहित्याकडून ललित लेखक स्वीकारतो तेव्हा रसिकास लोकसाहित्याची आठवण येते.

ललित लेखक लोकसाहित्या कडून उसनवारी करीत असल्यामुळे ललित वाङ्मयाच्या आकलनासाठी व आस्वादासाठी लोकतत्वीय दृष्टीचा अवलंब करावा लागतो. लोकवाङ्मय म्हणजे सामूहिक मनाचा आविष्कार असतो. ललित साहित्यात समूह मनाऐवजी व्यक्तीमनाचा आविष्कार असतो; मात्र ललित लेखक लोक वाङ्मयाकडून उसनवारी करतो; तेव्हा त्याच्या नकळत लोक मानसाचा आविष्कार करीत असतो. अशा प्रकारे व्यक्ती निर्मित साहित्याकृतीत सहजपणे येणाऱ्या समूह मनाच्या आविष्कारास लोकतत्व म्हणतात. अशी लोकतत्वीय दृष्टी स्वीकारल्या शिवाय लोकसाहित्याच्या परिणामातून लिहिल्या गेलेल्या साहित्य कृतीचा आस्वाद घेता येत नाही. आणि आकलनही अशक्य होते.

लोकसाहित्यात ललितसाहित्याची व ललितसाहित्यात लोकसाहित्याची वैशिष्ट्ये आढळतात. त्यामुळे दोन्ही प्रकाराच्या साहित्यात सारखेपणा आढळतो. ललित लेखकाने लोक साहित्याच्या प्रभावातून आणि अशा प्रकाराच्या स्वता:वरील पारंपरि□ संस्कारातून लेखन केल्याने ललित साहित्याच्या गुणधर्मांबरोबरच लोकसाहित्याचे गुणधर्म त्याच्या लेखात येतात. लोकसाहित्यात ललित साहित्याचे काही गुणधर्म सापडतात.

ललित वाङ्मयावर कमी आधिक प्रमाणात लोकसाहित्याचा परिणाम जाणवतो. लोक साहित्याचा प्रभाव समजून घेण्यासाठी त्यात येणाऱ्या लोकसाहित्यातील घटकांचा शोध घेतला तरच लोकसाहित्य व ललित साहित्य यांच्यातील अनुबंध स्पष्ट होतील. हे घटक म्हणजे समाजातील रुढी, आचार-विचार, शकून-अपशकून, शुभाशुभ, लोकभ्रम, लो□प्रथा, लोककला, लोकाचार, धर्म, स्थानिक प्रथा, उत्सव प्रथा, दंतकथा, समजुती, म्हणी, जादूटोणा, कर्णी इत्यादी होत.

ललित साहित्याचा स्त्रोत म्हणून लोकसाहित्य व ललित साहित्य यांच्यातील अनुबंध तपासल्यास कोणत्या बाबतीत आणि किती उसनवारी ललित लेखकांनी लोकसाहित्याकडून केली याचा अंदाज घेता येईल. ही उसनवारी इतकी बेमालूम असते की, सहजासहजी लक्षात येत नाही. दोन्हीमध्ये एक समान धागा असल्यामुळेच हे शक्य होते.ग्रामीण साहित्याची संकल्पना समजून घेण्यसाठी त्याचा स्त्रोत असलेल्या लोकसाहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरतो.

ललित साहित्याचा आस्वाद घेताना किंवा अभ्यास करताना ललित साहित्याच्या प्रेरणा लोकसाहित्यात असल्याचे निदर्शनास येते. ललित लेखकाने लोकसाहित्याचे अनुकरण केलेले असते. प्रतिभा सामर्थ्यामुळे तद्विषयक अनुभवांमुळे हे अनुकरण त्याने □लात्मकतेने केल्यामुळे त्याचे स्वत:चेच वाटू लागतात. लोक साहित्याचा ललित साहित्यावर विलक्षण प्रभाव असल्यामुळे परस्परांचे संबंध व त्यामुळे निर्माण झालेले साम्य आपल्या निदर्शनास येते.

लोकसाहित्य व ललित साहित्य यांच्या प्रेरणा वेगळ्या आहेत. त्यातही ललित साहित्यिक लोकसाहित्या पासून प्रेरणा घेऊन □ाही प्रमाणात लोकसाहित्याच्या तोंडवळ्याचे लेखन करतो; मात्र लोकसाहित्यात समूहमनाचा आविष्कार होतो; तसे ललित वाङ्मयात आत्माविष्कार होतो; म्हणजे प्रत्येक व्यक्तिमत्वाचा स्वतंत्र अविष्कार होतो. असे असले; तरी उभयतांतील अनुबंध मात्र नाकारले जात नाहीत.

लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांच्यात बऱ्याच प्रमाणात साम्य असल्याचे आपल्या निदर्शनास येते. ललित लेखकांनी लोकसाहित्यातील कल्पनाबंध घेऊन निर्मिती केलेली असते. ललित साहित्य म्हणताना त्यातील सर्वच प्रकार-उपप्रकार गृहीत आहेत. लोकसाहित्यातील 'लो□' चा अर्थ समजला की, लोकसाहित्या विषयी काही एक अंदाज आपणास येतो. 'लो□' ही संज्ञा समूहदर्श□ आहे. 'लो□' म्हणजे अनेक व्यक्तींचा समूह. उद्देशहीन अनेक व्यक्तींचा विस्कळीत समूह येथे अपेक्षित नसून समान संस्कृती परंपरा जपणारा कोणताही मानवी समूह म्हणजे 'लो□.' संस्कृतीच्या नावाखाली अंतर्भूत होणाऱ्या सर्व घटकांचे पालन करणारा समुदाय म्हणजे 'लो□'.

'लो□' म्हणजे अनागर किंवा ग्रामीण सामान्य लोक, बहुजन समाज, ग्रामपध्दतीने परंपरा जपत जीवन जगणारा समाज. ज्यांच्या जगण्यातून वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडते असा वर्ग.

अशा स्वरुपाच्या लोकसमूहाकडून प्राचीन काळापासून लोक साहित्याची परंपरा निर्मा□ झाली आहे. अनागर, बहुजन, श्रमजीवी समाजाचा समावेश लोकसाहित्य निर्माण करणारांमध्ये होतो. ग्रामीण साहित्यिक लोकसाहित्याच्या समृध्द वारसाचा आपल्या लेखनासाठी उपयोग करीत असतो. अर्थात ती हुबेहूब नक्कल नसते; तर लेखकाच्या प्रतिभेचा तो चमत्कार असतो. ग्रामीण साहित्याचा अभ्यास □रताना पारंपारिक सामूहिक मनाचे प्रकटीकरण होताना दिसते. त्यामुळे लोकसाहित्यातून अनेक प्रतिमा मराठीतील चांगल्या साहित्यकृतीत दिसून येतात. ग्रामीण साहित्यिकां समोर वर्तमानकाळ आणि लोकसाहित्याची पारंपारि□ता यांचा सम-वय □ामी□ ले□ प्रतिभा शक्तीने घडवून आणतो. ग्रामीण लेखकास लोकसाहित्यातून मिळणाऱ्या रसदीचा उपयोग करुन आपल्या लेखनाची यशस्वी वाटचाल करतो असेच म्हणावे लागेल. हा खरे तर एकतर्फी अनुबंध म्हणावा लागेल; जो ग्रामीण लेखकाने निर्माण केलेला असतो. लोकसाहित्याचा कुणी असा एक कर्ता नसतो; मात्र बिंब प्रतिबिंबात्मक एकात्मता या दोन्हींमध्ये असते.

लोक साहित्य व ग्रामीण साहित्य यांच्या उगमाची एकच पार्श्वभूमी आहे आणि ती आहे ग्रामीण परिसर. लोकतत्व हा लोकसाहित्याचा कणा आहे. हे लोकतत्व ग्रामीण मानसिकतेतून निर्माण झालेले असते. या लोकतत्वांचा जेव्हा ग्रामीण लेखक आधार घेतो तेव्हाच ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यांचा संबध येतो. यच्ययावत ग्रामीण साहित्याचा लोकसाहित्याशी संबंध येत नाही. जेव्हा लोकतत्वीय सामग्रीचा उपयोग ग्रामीण लेखक करतो; तेव्हा आकाराला आलेल्या □ामीण साहित्याच्या आकलनासाठी पुन्हा लोकसाहित्याची पार्श्वभूमी तपासावी लागते आणि या तपासात दाहोतील अनुबंधाचा धागा हाती लागतो.

ग्रामीण साहित्यकृतींचे अनुभवविश्व ग्रामीण परिसर असते. या ग्रामीण भागात जीवन जगणारा समाज अनेक कारणांनी सामूहिक जीवन जगत असतो. सामूहिकता हे ग्रामीण समाजाचे वैशिष्ट्य असते. त्यांची एक जगण्याची पध्दती असते; जी नागरी समजापेक्षा एकदम भिन्न असते. श्रध्दा, भय, लोकोत्सव, जत्रा, यात्वात्मक शक्तींवर विश्वास, सण, वार, लोकभ्रम, परंपरा, रुढी इत्यादी बाबींचा ग्रामीणांच्या जगण्यात आढळ असतो. हीच लोकसंस्कृती होय. एखाद्या ग्रामीण लेखकाने या घटकांचा आपल्या लेखनातून उपयोग ला की, त्याचे नाते लोकसाहित्याशी जोडले जाते. हाच ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य यातील अनुबंध होय.

ग्रामीण भागातील लोकदैवतांची उपासना हे भारतीय लोकसंस्कृतीचे महत्वाचे अंग आहे. शिक्षण, सुधारणा इत्यादी कारणांनी या उपासक संस्था मोडकळीस आल्या आहेत. मात्र जसे जसे आपण मागे जाऊ तसे या संस्थांचे कार्य मोठ्या प्रमाणात सुरु होते. गोंधळी, वासुदेव, पोतराज, वाघ्या-मुरळी, ओव्यागाणारे धनगर, भराडी हे लोकदैवतांचे उपासक होते. या दैवतांच्या उपासनांमध्ये पूजाविधी, यात्रा, उत्सव, दैवत माहात्म्य वर्णन करुन, गाऊन, कथेच्या माध्यमातून सांगून लोकांच्या श्रध्दा बळकट करण्याचे काम हे लोक करीत होते. त्या मुळे धर्म विषयक एक सामूहिक मानसिकता तयार होत असे. या संस्थांचे कार्य ग्रामीण भागत मुख्यत्वे चालत असल्याने ग्रामीण लेखकाने हे अनुभवलेले असल्यामुळे आपोआपच त्याच्या लेखनाचा विषय या लोकसंस्था झाल्या. याचा सूक्ष्म अभ्यास ग्रामीण साहित्य संकल्पना स्पष्टकरण्यास उपयुक्त ठरणार आहे.

संदर्भ :-

१)मांडे प्रभाकर - 'लोकसाहित्याचे स्वरुप' दावरी प्रशन, औरंगाबाद, आ. चौथी - २०१४
२)डॉ. कालभूत पुरुषोत्तम- 'लोकसाहित्य स्वरुप आणि विवेचन'- विजय प्रकाश-न, -ापुर, आवृत्ती पहिली- २००७
३)डॉ. व्यवहारे चंद्रकांत- 'लोकवाङ्मय रुप स्वरुप' साहित्य सेवा प्रशन, औरंगाबाद आवृत्ती पहिली १९९१
४)डॉ. शिंदे विश्वनाथ, 'लोकसाहित्य मीमांसा' स्नेहवर्ध-न पब्लिशिहाऊस, पुणे आवृत्ती पहिली २००६.P-140